# परिणाम आधारित शिक्षणातून एनईपीची उद्दिष्टे साध्य

## संचालक प्रसन्न आचार्य : बोर्डा सरकारी महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ३१ : नव्या शैक्षणिक धोरणात अनुभवात्मक शिक्षण, समस्या निर्मूलन आणि समीक्षात्मक विचारसरणी या उद्दिष्टांना प्राधान्य दिलेले असून ही उद्दिष्टे परिणाम आधारित शिक्षण प्रणालीच्या (ओबीई)(आउटकम बेस्ड एज्युकेशन) प्रभावी अंमलबजावणीतून साध्य होतील, असे प्रतिपादन माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स आणि संवाद खात्याचे संचालक प्रसन्न आचार्य (आयएएस)यांनी केले.

बोर्डा सरकारी महाविद्यालय (स्वायत्त) आणि उच्च शिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या परिणाम आधारित शिक्षण (ओबीई) : काळाची गरज या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनसत्रात प्रमुख पाहुणे म्हणून संचालक प्रसन्ना आचार्य बोलत होते.




**शिक्षणातील परिणामकारकता वाढवणे आणि विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी परिपूर्णरित्या तयार करणे या दोन्ही उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी परिणाम आधारित शिक्षणाची (ओबीई) भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. परिणाम आधारित शिक्षणाची उद्दिष्टे एनईपीच्या उद्दिष्टांशी जुळतात.**
**– डॉ.एफ.एम.नदाफ,**
**प्राचार्य, बोर्डा सरकारी महाविद्यालय (स्वायत्त)**

यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून केरळ येथील एमसीए कार्यक्रमाचे संचालक जेकब मेंडस, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एफ. एम. नदाफ आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एफ. एम. नदाफ यांनी केले. प्रा.ओंकार ऐनापूर यांनी मुख्य मार्गदर्शक जेकब मेंडस यांची ओळख करून दिली. प्रा. पूजा दळवी, प्रा. शुभम गुडे, प्रा. अलरॉय मास्कारेन्हास यांनी या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून भूमिका बजावली. प्रा. नाजिया शेख यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रा.पूजा दळवी यांनी मानले. या कार्यशाळेला सरकारी महाविद्यालयातील आयक्यूएसी आणि नॅकचे समन्वयक, एनईपी नोडल अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालयातील अधिकारी उपस्थित होते.

**संचालक जेकब मेंडस यांचे बहुमूल्य मार्गदर्शन**

संचालक जेकब मेंडस यांनी ओबीईचे महत्त्व, परिणाम आधारित शिक्षण अर्थात ओबीई हे प्रत्यक्षात प्रभावीपणे कसे अंमलात आणावयाचे आणि त्याचे मूल्यांकन कसे करावयाचे यावर बहुमूल्य मार्गदर्शन केले. परिणाम आधारित शिक्षणाची प्रमुख कार्यक्षेत्रे, परिचय, शिकण्याची क्षेत्रे, निकालांची रचना, प्राप्ती गणना, विश्लेषणात्मक अहवाल आणि उपयुक्त साधने या घटकांचे विश्लेषण संचालक जेकब मेंडस यांनी केले.

# साताऱ्यात पीएनजी ज्वेलर्सचे ५०वे दालन सुरू!

टीम दैनिक हेराल्ड

मुंबई / पुणे, दि. ३१ : महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय आणि विश्वासाई पारंपरिक ज्वेलर्स, पीएनजी ज्वेलर्स यांनी ऐतिहासिक सातारा शहरात आपल्या नव्या दालनाचे उद्घाटन करून प्रादेशिक ज्वेलरी बाजारात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. या नव्या दालनामुळे पीएनजी ज्वेलर्सची एकूण ५० दालनांची संख्या पूर्णझाली असून हा ब्रँड आता जागतिक पातळीवर एका नव्या टप्प्यावर पोहोचला आहे. सुप्रसिद्ध अभिनेते स्वप्नील जोशी यांच्या हस्ते सातारा येथील दालनाचे उद्घाटन करण्यात आले. पीएनजी ज्वेलर्सने मागील काही महिन्यांपासून त्यांच्या विस्तार धोरणाचा वेग वाढवला आहे. २०२४च्या नवरात्रीत सलग ९ दिवसांत ९ नवीन दालने सुरू करण्याचा विक्रम पीएनजी ज्वेलर्सने रचला होता. पीएनजी ज्वेलर्सच्या या नियोजित विस्तारतून दिसून येते की, द्वितीय आणि तृतीय श्रेणीत येणाऱ्या शहरांमधील ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडींना अधिक चांगल्याप्रकारे समजून घेण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

१९३ वर्षांची परंपरा, ३० लाखांहून अधिक ग्राहक, आणि पिढ्यानपिढ्या टिकवलेला विश्वास ही पीएनजी ज्वेलर्सची ओळख आहे. भारतासह यूएसएमध्येही पीएनजी ज्वेलर्स आज घडीला घराघरात पोहोचला आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, पीएनजी ज्वेलर्सने ५० दालनांचा टप्पा गाठल्याचा आम्हाला अतिशय आनंद आहे. हा आमच्या दीर्घ प्रवासातील हा एक अविश्वसनीय टप्पा असून पुढे भविष्यात आणखी मोठी उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू.

पान १ वरून

## बेफिकीर कंत्राटदारामुळे इंधन पाईपलाईन फुटली!

फक्त दोन दिवसांपूर्वी, पंपिंग सुरू असताना पाईपलाईनजवळ धोकादायकपणे खोदकाम सुरू झाले. आमच्या विनंतीला न जुमानता, कंत्राटदाराच्या टीमने उच्च अधिकाराशिवाय थांबण्यास नकार दिला. आम्हाला पोलिसांना सामील करावे लागले, ज्यांनी काम थांबवण्यासाठी हस्तक्षेप केला, असे ते म्हणाले. नायक यांच्या मते, कंपनीने सुरक्षिततेसाठी पाईपलाईनचे स्थान सिमेंटचे खांब आणि खड्डे देऊन चिन्हांकित केले होते. तथापि, साइटवरील सुरक्षा कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या निष्काळजीपणामुळे जीवितहानी होऊ शकते,असा इशारा त्यांनी दिला. कंपनीने आश्वासन दिले आहे की सध्याचा इंधनाचा साठा १० दिवसांपर्यंत पुरेल, त्यामुळे तातडीने इंधनाचा तुटवडा निर्माण होणार नाही. तथापि, खराब झालेल्या पाईपलाईनच्या दुरुस्तीसाठी चार दिवस लागण्याची अपेक्षा आहे. आम्ही नुकसानीचे मूल्यांकन करू आणि ताबडतोब दुरुस्ती सुरू करू. काम सुरू असताना वाहतूक सुरू राहील. इंधनाचे एक जहाज उद्या येणार आहे, परंतु नुकसानीमुळे आम्हाला त्याचे आगमन पुढे ढकलावे लागू शकते, असे नायक पुढे म्हणाले. वास्कोचे पोलिस निरीक्षक कपिल नायक यांनी परिस्थिती नियंत्रणात असल्याची पुष्टी केली. तात्काळ कोणताही धोका नाही. अधिकारी घटनास्थळी आहेत आणि आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली जात आहे, असे त्यांनी सांगितले. वास्को वाहतूक पोलिस निरीक्षक शैलेश नार्वेकर म्हणाले की, सार्वजनिक सुरक्षेसाठी वाहतूक व्यवस्था बदलण्यात आली आहे. वाहने चिखली आणि विशाल मेगा मार्ट रोडने वळवण्यात आली आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी परवानगी दिल्यानंतर सामान्य वाहतूक सुरू होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. घटनास्थळाला भेट देणारे मुरगाव मामलेदार प्रविणजय पंडित यांनी सुरक्षेच्या उपाययोजना केल्या आहेत असे आश्वासन दिले. तात्काळ धोका कमी करण्यात आला आहे, परंतु खबरदारी म्हणून वाहतूक वळवणे आवश्यक होते. आम्हाला झुआरी आयएव्हीकडून लेखी आश्वासन मिळाले आहे की दुरुस्तीच्या कामामुळे रहिवाशांना किंवा प्रवाशांना कोणताही धोका नाही. चांगले समन्वय सुनिश्चित करण्यासाठी आणि भविष्यातील अपघात टाळण्यासाठी कंत्राटदारासोबत बैठक घेतली जाईल, असे त्यांनी सांगितले.

## जर्मन पर्यटक महिलेवर भटक्या कुत्र्यांचा हल्ला

पडल्यानंतर उर्सुलाने जवळच्या बीच कॅफेमध्ये आश्रय घेतला. तथापि, तिने दावा केला की कर्मचाऱ्यांनी या घटनेला गंभीरपणे न घेता, कुत्र्यांना लसीकरण करण्यात आले आहे आणि काळजी करू नका, असा आग्रह त्यांनी धरला. त्यांनी तिला जखम स्वच्छ करण्यासाठी साबण आणि आंघोळ करण्यास सुचवले पण तिने ते नाकारले.अखेर दोन ब्रिटिश पर्यटकांकडून तिला मदत मिळाली, ज्यांनी जंतुनाशक पुरवले आणि मडगाव येथील व्हिक्टर हॉस्पिटलमध्ये कॅबची व्यवस्था केली. तेथील वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी पुष्टी केली की त्यांनी अलीकडेच अनेक कुत्र्यांच्या चाव्याव्दारे बळींवर उपचार केले आहेत, ज्यामुळे अशा घटनांची वाढती वारंवारता अधोरेखित झाली आहे. मोबोर बीचवर अशाच प्रकारची घटना घडल्यानंतर काही दिवसांतच हा हल्ला झाला आहे, ज्यामुळे सार्वजनिक सुरक्षितता आणि गोव्यात भटक्या कुत्र्यांच्या व्यवस्थापनाच्या प्रभावीतेबद्दल गंभीर चिंता निर्माण झाली आहे. पर्यटक आणि स्थानिक दोघेही ही समस्या आणखी वाढण्यापूर्वी ती सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करत आहेत. सरकारी अधिकारी मात्र याबाबतीत अजूनही ढिम्म आहेत. अधिकाऱ्यांनी कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या वाढत्या संख्येवर अद्याप भाष्य केलेले नाही. परंतु, आता परदेशी पर्यटक त्यांच्या चिंता व्यक्त करत असल्याने, त्वरित कारवाईसाठी दबाव वाढत आहे.

## ट्रक मालक संघटनेचा आक्रमक पवित्रा कायम

आश्वासन दिले होते की कंपनी स्थानिक ऑपरेटर्सच्या ट्रकना परवानगी देईल आणि आता अचानक बाहेरील कंत्राटदाराची नियुक्ती केली आहे. सुरुवातीला कंपनीने हे १२ चाकी ट्रक सुमारे एक आठवडा चाचणी तत्त्वावर चालवले आणि नंतर हे २२ ट्रक गेल्या दोन महिन्यांपासून खाण ब्लॉकमध्ये निष्क्रिय अवस्थेत होते. परंतु आता अचानक कंपनीने त्यांचा वापर खनिज वाहतूक करण्यासाठी करण्यास सुरुवात केली आहे.खाण कंपनीकडून ठोस आश्वासन न मिळाल्याने, ट्रकचालकांनी गुरुवारपासून वाहतूक थांबवली आहे. आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये आणि प्रेमेंद्र शेट आणि ट्रकचालक आणि खाण कंपनीच्या प्रतिनिधींमध्ये झालेल्या संयुक्त बैठकीत हा प्रश्न सुटला नाही. दोन्ही आमदारांनी कंपनी प्रतिनिधींना स्थानिक ट्रकचालकांना प्राधान्य देण्यास सांगितले आहे. कंपनी प्रतिनिधींनी आता सांगितले आहे की, ते सर्व भागधारकांसह सहकार्याने धातू वाहतूक आणि इतर संबंधित खाणकामांचे प्रश्न सोडवतील.

## मांडवी प्रदूषणात सर्वांत मोठा घोटाळा : पालेकर

सल्लाही पालेकर यांनी दिला आहे. मिरामार, कांपाल भागातल्या पाण्यात आढळलेले ' ई – कोली ' सारखे बॅक्टेरिआ हे नेमके कुठून येतात ? ते या कॅसिनोंकडून होणाऱ्या सांडपाण्याच्या निचऱ्यामुळे निर्माण झालेत का ? याचा तपास होणे आवश्यक असल्याचे पालेकर म्हणाले. सांता मोनिका जेट्टीपासून मिरामारपर्यंतचा संपूर्ण भाग प्रदूषित झाला असल्याचे ते म्हणाले. स्मार्ट सिटी देखील रुआ दे ओरेम खाडीत कच्चे सांडपाणी सोडत असल्याचा आरोप त्यांनी केला. मळा भागातील विठोबाच्या मंदिराकडे जे सांडपाणी ओव्हरफ्लो होते ते थेट रुआ–दे – ओरेम नाल्यातून समुद्रात जाते, ज्यामध्ये सांतइनेज नाल्यातील पाण्याचाही समावेश असल्याचे ते म्हणाले. मांडवी खाडीचे मुख सर्वांत जास्त प्रदूषित झाल्याचा दावा पालेकर यांनी केला असून सरकारने हे सर्व डेटा ॲनालिसिस ( आकडेवारीचा तपशील ) सार्वजनिक करावा, अशी मागणी केली आहे. या परिसरातील एक घोट पाणी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पिऊन दाखवावे, असे आव्हान देखील पालेकर यांनी दिले आहे. प्रदूषण कायद्याचे सर्रासपणे उल्लंघन होत असताना जाणीवपूर्वक अशा आस्थापनांना अभय देण्यात सुरू असलेल्या या घोटाळ्याचा लवकरच आपण पर्दाफाश करणार असल्याचा दावा यावेळी त्यांनी पत्रकार परिषदेत केला .

# म्हापशात घातले १०८ सूर्यनमस्कार

टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. ३१ : बार्देश पतंजली योग समिती व जॉगर सोशल असोसिएशनतर्फे गणेश गुरुकुल धुळेर म्हापसा येथे १०८ नमस्कार घालण्यात आले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून एयर वाईस मार्शल सुनील नानोडकर उपस्थित होते. मुख्य अतिथी म्हणून माजी उपमुख्यमंत्री दयानंद नार्वेकर उपस्थित होते. यावेळी मंचावर पतंजली योग समिती अध्यक्ष अशोक साळगावकर, योग गुरु चंद्रकांत वसकर, योग गुरु संदीप मोरजकर, पूजा मंगेशकर, सिद्धेश राऊत, गणेश गुरुकुल अध्यक्ष सुषमा नार्वेकर, पतंजली जिल्हा अध्यक्ष कल्पेश मुळगावकर, जॉगर सोशल असोसिएशन अध्यक्ष दिगंबर हरमलकर व बॉबी ऊर्फ सदानंद तळावलीकर यावेळी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे नानोडकर यांचा शाळ श्रीफळ, भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी १०८ सूर्यनमस्कार घातल्यानंतर योग गुरु चंद्रकर वसकर यांच्या ७५ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. स्वागत अशोक साळगावकर यांनी केले तर सूत्रसंचालन संदीप मोरजकर यांनी केले. बॉबी उर्फ सदानंद तळावलीकर यांनी आभार मानले.

**WANTED**
**We are hiring for Manohar International Airport Goa**
**For Telecom SIM Card Sales, Retail Sales, CSA,**
**Prior experience is mandatory.**
**Graduation / Degree is must.**
**Preference will be for Bonafide Goans**
**CXSOL**
**(Connectivity Solutions)**
**PH 78419 18502**
**cxsol.gox@gmail.com**

**CHANGE IN NAME**
I, **MARIA DENIS DSOUZA** Resident of H No 266/1,Olmas Pirnikar,Opp Holy Cross Chapel,Vaddem Socorro,Porvorim Bardez Goa has change my name from **D'COSTA MARIA FATIMA ARTIMIZIA FALEIRO** to **MARIA DENIS DSOUZA.** Hereinafter in all my dealings and documents I will be known by new name of as **MARIA DENIS DSOUZA**

GOVERNMENT OF GOA
OFFICE OF THE ASSTT. REGISTRAR OF COOPERATIVE SOCIETIES, ARBITRATION/ EXECUTION, NORTH GOA DISTRICT,
At "Sahakar Bhavan", 1st Floor, Curti, Ponda Goa.
**ABN Case No.:-ARCS/VPK/CURTI/2023/ABN/2090**
VPK Urban Co-operative Credit Society Ltd.
Curti Branch, Curti- Goa. .....Disputant
V/s
1.Mr. Immamsaheb Babasaheb Mulla : H.No.297/8, Pratapnagar Pilliem, Dharbandora Goa.
2.Mrs.Rameja Immamsaheb Mulla: H.No.297/8, Pratapnagar Pilliem, Dharbandora Goa.
3.Mr. Habib Makboorsab Satkagialli: H.No.4/139/2/3, Nr. G.P.S Durghabhat ,Ponda-Goa.
.......Opponents
**(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)**
To,
The Opponent No. 1, 2 & 3
WHEREAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.
AND WHEREAS the disputant has claimed a sum of **Rs.191903.80** (Rupees One Lakh Ninety One Thousand Nine Hundred Three and paise Eighty Only with accrued interest thereon and cost.
AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks **"Insufficient Address** returned to sender" respectively.
AND WHEREAS, the disputant vide application dated 31.01.2025 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.
AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.
NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on 27.02.2025 at 10.30 a.m. and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.
TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.
Given under my hand & seal of this office on this 31st day of January 2025.
SEAL
Sd/- **(Harischandra S. Gawde)**
Asstt. Registrar of Co-op Societies
ABN/EXE North Goa District Curti
Ponda- Goa.
Place: Ponda
Date: 31.01.2025

**CHANGE IN NAME**
I **PITTU CORREIA** RES OF HNO 907 BAMBORDEM MOIRA BARDEZ GOA WOULD LIKE TO CHANGE MY NAME FROM **PITTU SIMOES** TO **PITTU CORREIA** HERE IN ALL MY DEALINGS AND DOCUMENTS I WILL BE KNOWN AS **PITTU CORREIA.**

**CHANGE IN NAME**
I, **Dumiana Pereira,**
resident of House No. 1387, Damon (West), Raia, Salcete, Goa, would like to change my name from **Dumiana Pereira e Fernandes** to **Dumiana Pereira.**
Hereinafter in all my future dealings and document I will be known as
**Dumiana Pereira**
Sd/-
**Dumiana Pereira**

।। श्री देवी चामुंडेश्वरी प्रसन्न ।।
**निवडणूक कार्यक्रम**
**श्री चामुंडेश्वरी देवस्थान, वरगांव–पिळगांव, डिचोली–गोवा**
**कार्यकारी मंडळ – निवडणूक वर्ष २०२५–२०२८**

१. निवडणूक अर्ज देवस्थानच्या कार्यालयात शनिवार दि. १ व रविवार दि. २ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी ३.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील.
२. एका महाजनाला एकाच पदासाठी निवडणूक लढविता येईल.
३. एका महाजनाला एकाच पदासाठी एकाहून जास्त उमेदवाराला सूचक अथवा अनुमोदक देता येणार नाही. एकाच महाजनाने एकाच पदासाठी एकाहून जास्त उमेदवार पुरस्कृत केले तर ते अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.
४. महाजनांनी उमेदवारी अर्ज देवस्थानच्या कार्यालयात मंगळवार दि. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्या. ३.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत संपूर्ण भरून सादर करावा. अर्जासोबत उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे.
५. उमेदवारी अर्ज सादर करताना महाजन उमेदवाराने स्वतः हजर राहणे बंधनकारक आहे.
६. प्रत्येक भरलेल्या अर्जांची छाननी बुधवार दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी ३.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत देवस्थानच्या कार्यालयात करण्यात येईल. छाननीच्या वेळी उमेदवाराला हजर रहाता येईल.
७. उमेदवारी अर्ज ता. ०६.०२.२०२५ रोजी संध्याकाळी ३.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत मागे घेता येईल.
८. पात्र उमेदवारांची यादी ता. ०७.०२.२०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वा. देवस्थानच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.
९. निवडणूक रविवार दिनांक ९. फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. अध्यक्षांच्या स्वागतपर भाषणानंतर श्री चामुंडेश्वरी मंगल कार्यालयात सुरू करण्यात येईल.
१०. मतदान रविवार ता. ०९.०२.२०२५ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत देवालयात उपस्थित असलेल्या महाजनांना करण्यास देण्यात येईल.
११. देवालयात असलेल्या महाजनांचे मतदान झाल्यानंतर ताबडतोब मतमोजणी करण्यात येईल व निकाल जाहीर करण्यात येईल.
१२. एकाच पदासाठी उमेदवाराला समान मते पडली तर सोडत काढण्यात येईल व सोडतीत येणाऱ्याचे नाव विजयी उमेदवार म्हणून घोषित करण्यात येईल.
१३. मी दिलेला निर्णय निर्णायक असेल.
१४. वरील प्रक्रियेत कदाचित बदल करावा लागला तर बदल करण्याचा मला अधिकार आहे.

आपले,
अध्यक्ष/ निवडणूक अधिकारी, सर्वसाधारण सभा
**सही/–**
**श्री. उमेश रा. शेट गोवेकर**
**सचिव**

# शैक्षणिक ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान संपादन करा

## माजी प्राचार्य गजानन मांद्रेकर यांचे आवाहन

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. ३१ : विद्यार्थ्यांनी शैक्षणिक ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान संपादन करावे, असे प्रतिपादन गणेश विद्यालयाचे माजी प्राचार्य गजानन मांद्रेकर यांनी केले.

पेडणे येथील व्हायकांऊट ऑफ पेडणे हायस्कूलच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने एप्रिल २०२४च्या शालांत परीक्षेत प्रथम येणाऱ्या व ८० टक्केच्यावर गुण मिळविलेल्या पाच विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यामधील विद्यार्थी वैभव परब (८८.८ टक्के), अनुप कामत (८८.३ टक्के), आत्माराम परब (८६.३ टक्के), सायली शेट्ये (८३.३ टक्के), यश देमजी (८१. २ टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश होता.




पेडणे : गौरवमूर्ती सोबत प्रा. गजानन मांद्रेकर, राजू बोंद्रे व इतर.

या सोहळ्याला सन्मानीय पाहुणे म्हणून व्हायकांऊट हायस्कूलचे मुख्याध्यापक राजेंद्र बोंद्रे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष दुर्गादास परब, सचिव चंद्रकांत सांगळे, खजिनदार महेश स्वार, कार्यक्रम प्रमुख तुळशीदास राऊत, माधव शेणई देसाई, राजमोहन शेट्ये आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

सुरूवातीला माजी विद्यार्थी तथा पेडणे मतदार संघाचे माजी आमदार परशुराम नागेश कोटकर यांच्या निधनाबद्दल एक मिनिट उभे राहून त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

अध्यक्ष दुर्गादास परब यांनी प्रास्ताविक केले तर महेश स्वार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुषमा गावडे यांनी केले तर तुळशीदास राऊत यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यास बिंदीया कोटकर, शिवराम देशप्रभू, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाने सहकार्य केले.

# बौद्धिक संपदा हक्कावर आंबिये महाविद्यालयात चर्चासत्र

## वाणिज्य विभागातर्फे आयोजन; मान्यवर तज्ज्ञांचे बहुमूल्य मार्गदर्शन

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. ३१ : संत सोहिरोबानाथ आंबिये कला अणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, विर्नोडा येथील वाणिज्य विभाग, कायदेशीर मदत कक्ष पेडणे आणि व्ही.एम.साळगावकर कायदा महाविद्यालय, मिरामार यांच्या संयुक्त विद्यमाने 'बौद्धिक संपदा हक्क' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले होते. आंबिये महाविद्यालयाच्या परिषद सभागृहात झालेल्या या राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रविणा



पेडणे : बौद्धिक संपदा हक्क या विषयावर आयोजित केलेल्या राज्यस्तरीय चर्चासत्रात मुख्य मार्गदर्शक ॲड. रेजिता राजन व ॲड. नेहा शिरोडकर यांच्यासमवेत महाविद्यालयाचे विद्यार्थी, मुख्य समन्वयक डॉ.वीरेंद्र आमोणकर व मान्यवर.

केरकर, मुख्य मार्गदर्शक ॲड.रेजिता राजन आणि ॲड. नेहा शिरोडकर, राज्यस्तरीय चर्चासत्राचे मुख्य समन्वयक डॉ. वीरेंद्र आमोणकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. मुख्य समन्वयक वीरेंद्र आमोणकर यांनी चर्चासत्र आयोजनामागची भूमिका कथन केली. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रवीणा केरकर यांचे मनोगत झाले. कायदेशीर मदत कक्ष पेडणेचे उपप्रभारी गोविंद सावंत यांनी मुख्य मार्गदर्शकांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन फ्रॅकलिना फर्नांडिस यांनी केले. आभार प्रा. वर्षा रेडकर यांनी मानले.

**बौद्धिक संपदा हक्काला महत्त्व : डॉ. आमोणकर**

जागतिक ज्ञान अर्थव्यवस्थेत बौद्धिक संपदा हक्काला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे, असे राज्यस्तरीय चर्चासत्राचे मुख्य समन्वयक डॉ.वीरेंद्र आमोणकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले. नवोपक्रम आणि सर्जनशील कार्याचे संरक्षण आणि वाढ, नवोपक्रम आणि नैतिक पद्धतीना चालना देण्यासाठी बौद्धिक संपदा हक्काची माहिती असायला हवी, असे आमोणकर म्हणाले.

**भौगोलिक संकेताचे योगदान मोठे : ॲड. राजन**

ट्रेडमार्क आणि जीआय(भौगोलिक संकेत) हे बौद्धिक संपदेचे महत्त्वाचे प्रकार असून त्यांचेसविस्तर विश्लेषण आणि अभ्यासपूर्ण माहिती ॲड. रेजिता राजन यांनी दिली. ट्रेडमार्क आणि जीआय हे दोन प्रकार नियंत्रित करणा्या कायदेशीर बाबींकडेही त्यांनी लक्ष वेधले. ट्रेडमार्कची कायदेशीर प्रक्रिया आणि नोंदणी प्रक्रिया अधोरेखित करून उत्पादनाची प्रतिष्ठा जपण्यात जीआयचे योगदान मोठे असते, असेही त्या म्हणाल्या.

**बौद्धिक संपदेचा आदर करा : ॲड. शिरोडकर**

कॉपीराईट, लेखक आणि मालकी या विषयावर ॲड नेहा शिरोडकर यांनी मार्गदर्शन केले. ॲड. शिरोडकर यांनी कॉपीराईटची संकल्पना अधोरेखित करण्याबरोबरच कॉपीराईट नोंदणी आणि अंमलबजावणीमध्ये समाविष्ट असलेल्या कायदेशीर प्रक्रियांबद्दल अंतर्दृष्टी दिली. बौद्धिक संपदा अधिकार ओळखणे आणि त्याचा आदर करणे किती महत्त्वाचे आहे, यावरही त्यांनी प्रकाशझोत टाकला.

# भूमिका हायस्कुलात मेधासुक्तम प्रशिक्षण

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ३१ : वेद विद्या प्रतिष्ठान व वेदपुरुष फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवसांचा मेधासुक्तम प्रशिक्षण कार्यक्रम श्री भूमिका शिक्षण संस्था संचलित श्री भूमिका हायस्कूल पर्ये सत्तरी येथे नुकताच संपन्न झाला. वेदगुरू प्रसाद देशमुख यांनी विद्यार्थ्यांना गणेश प्रार्थना, मेधासुक्तम, स्वस्तिवाचक मंत्र याबद्दल माहिती दिली आणि त्यांच्या मानवी जीवनात काय महत्त्व आहे याचे सविस्तर विवेचन केले. त्यानंतर योग्य स्वरात या मंत्राचे उच्चार कसे करावे हे समजावून सांगितले.




साखळी : मेधासुक्तम प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेल्या पर्ये भूमिका हायस्कूलच्या शिक्षकांसोबत वेदगुरू प्रसाद देशमुख (राघोबा पेडणेकर)

सात दिवस चाललेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी तसेच शाळेचे व्यवस्थापक शंकर च्यारी हेही या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झाले.

कार्यक्रमाचे उद्घाटन वेद विद्या प्रतिष्ठान गोवा राज्य समन्वयक डॉ. स्वप्निल सालेलकर, हायस्कूलचे मुख्याध्यापक दिवाकर पोसनाईक, हायस्कूलचे व्यवस्थापक शंकर च्यारी तसेच वेदगुरु पं. प्रसाद देशमुख यांच्या उपस्थितीत पार पडला. दीपप्रजलन करून पारंपरिक पद्धतीने हा उद्घाटन सोहळा झाला.

कार्यक्रमाच्या समारोप सत्रात विद्यार्थ्यांनी गणपती प्रार्थना मंत्र, मेधा सुक्तम, हंस गायत्री मंत्र व भोजनापूर्वीचे मंत्र यांचे पठण केले. सर्वांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आली. शाळेचे व्यवस्थापक शंकर च्यारी यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उत्तम राणे आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर नकुळ गावकर यांनी आभार मानले. पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष यशवंत नाईक हेही कार्यक्रमाला उपस्थित होते.




हरमल : जिल्हा तंबाखू निर्मूलन समिती आयोजित पोस्टर स्पर्धेतील विजेत्या बक्षीस प्रदान करताना वैद्यकीय नोडल अधिकारी डॉ. मोहनराव देसाई, सोबत डॉ. नंदिता नाडकर्णी व इतर.

# हरमल नर्सिंग कॉलेजचे पोस्टर मेकिंग स्पर्धेत यश

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ३१ : उत्तर गोवा जिल्हा तंबाखू निर्मूलन समिती आयोजित आंतर नर्सिंग महाविद्यालयीन पोस्टर मेकिंग स्पर्धेत हरमल पंचक्रोशी शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ नर्सिंगने प्रथम बक्षीस पटकावले. या विद्यालयाच्या ओल्फी डिकॉस्टा (प्रथम वर्ष जी एनएम) व उमा देवी पाल (प्रथम वर्ष बी एससी) यांनी पटकावले. कॉलेजचे प्रा. रेमो मनोज व प्राचार्य किरूबा यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदिता नाडकर्णी आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशाबद्दल प्राचार्य किरूबा, संस्थेचे चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर व पदाधिकारी तसेच पालक शिक्षक समितीने अभिनंदन केले आहे.